# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com/registrar@unigug.ac.in


जा.क्र. /गों.वि.ग/कुस.का./७७३०/२०२५ दि. १२/०९/२०२५

## परीपत्रक

विषय :- दैनिक सकाळ तर्फे पदवी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअरची दिशा दाखविणाऱ्या मार्गदर्शन कार्यक्रमाला विद्यार्थ्यांना पाठविणेबाबत.

गडचिरोली जिल्हयातील गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये तसेच विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विभाग प्रमुख, यांना कळविण्यात येते की, सकाळ माध्यम समुहातर्फे यंदाही दहावी आणि बारावीत उत्तीर्ण गुणवंतांचा सत्कार आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी करिअर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. विद्यार्थ्यांच्या यशात प्राचार्य म्हणून आपल्या सर्व शिक्षकांचा तेवढाच मोलाचा वाटा आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील, पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठता आले. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील, पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील पदवी व बारावीच्या प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सकाळ माध्यम समूहातर्फे गौरव करुन सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक नोंदणी करुन सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्याला स्टील वॉटर बॉटल मोफत मिळणार आहे तसेच उपस्थितांपैकी भाग्यवान विजेत्या विद्यार्थ्याला लॅपटॉप दिल्या जाईल. तेव्हा या कौतूक व मार्गदर्शन सोहळयाला आपल्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पाठवावे व सहभागासाठी आग्रह धरावा.

**टिप :- प्रत्येक येणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत आणावी.**

(आपल्या महाविद्यालयांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी Krishna.sharma@esakal.com या मेल आय डी वर किंवा ७७१९९९२२२८ या क्रमांकावर पाठवावी.)

**'वेधभविष्याचा सत्कार गुणवंतांचा'**

शनिवार, दिनांक १९ सप्टेंबर, २०२५

वेळ :- सकाळी १०.३० वाजता

स्थळ :- सुमानंद सभागृह, आरमोरी रोड, गडचिरोली

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव